**<u>नि. फौ. खटला क्र.५८/२०२०</u>**

**<u>निशाणी क्र.५७</u>**

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०२ चा पुरावा ::</u>**

**<u>शपथेवर सत्य निवेदन करतो की,</u>**

| | | |
|---|---|---|
| **<u>माझे नांव</u>** | : | रामकिशन व्यंकट बिरादार, |
| **<u>वय</u>** | : | ५० वर्षे, **<u>धंदा</u>** : शेती, |
| **<u>राहणार</u>** | : | गुरधाळ, ता. देवणी, जि. लातूर. |

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी साहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::</u>**

०१. मी ०३/०७/२०२० रोजी मी सहज पोलीस ठाण्यामध्ये गेलो होतो. परंतु पोलिसांनी मला बोलावले नव्हते. पोलिसांनी माझ्यासमक्ष तेथे लिहिले, परंतु त्याबाबत मला माहिती नाही. माझ्यासमक्ष जप्ती केलेली नाही. मी त्यावर सह्या केल्या होत्या. आता मला दोन जप्ती पंचनामे दाखविले. त्यावर माझ्या सह्या आहेत. परंतु त्यामधील मजकूर मला माहिती नाही. सदर सह्यांना अनुक्रमे नि.५८ व ५९ देण्यात येते.

०२. **<u>साक्षीदार पूर्वीच्या कृतीवर कायम नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरून साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.</u>**

०३. पोलिसांनी सदर दिवशी पोलीस ठाण्यामध्ये माझ्यासमक्ष वर्षा माधव घोगरे यांच्याकडून लोखंडी कुऱ्हाड दांड्यासह आणि बालाजी माधव मिरकले यांच्याकडून वक्र असलेली काठी जप्त केले आणि त्याबाबत पंचनामे तयार केले, असे घडले नाही. आरोपी हे माझ्या गावातील आहेत. मी त्यांना ओळखतो. परंतु हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना मदत करण्यासाठी खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**<u>:: आरोपी करिता उलटतपास विधीज्ञ श्री. बी.व्ही. पाटील यांनी नाकारला ::</u>**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.
दि.०९/०३/२०२६.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.